# ठाणे वार्ता

बातमी तीच, जी सत्य असेल!


# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त तानसा नदीकाठी स्वच्छता मोहिम

**वासिंद** – वनशक्ती संस्था, वन विभाग अंबाडी, कुणबी समाज संस्था ठाणे/पालघर जिल्हा, सुखभूमी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने व कृषी विभाग संजय घरत यांच्या सहकार्याने तर वनशक्ती संस्थेचे प्रकल्प अधिकारी निशांत पाटील, योगिता कासार यांच्या पुढाकाराने व नियोजनाने आयोजित जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून डाकिवली फाटा तानसा नदीकाठी व परिसरात भव्य स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेत प्लास्टिक पिशव्या, थर्माकोल, फाटके कपडे, काच, बाटल्या यांसारख्या पर्यावरणावर घातक परिणाम करणाऱ्या वस्तू मोठ्या प्रमाणावर संकलित करुन सुमारे ४०० किलोहून अधिक कचरा उचलण्यात आला. तर या उपक्रमात चांबळे गावांमधील शाळेतील २५ पेक्षा जास्त विद्यार्थी व ४० पेक्षा अधिक स्वयंसेवक व ग्रामस्थांनी या मोहिमेत सहभाग घेतला होता. तर यामध्ये नदीकाठचा कचरा उचलणे व नागरिकांना जनजागृतीपर संदेश देण्यात आले असल्याचे जयेश शेलार यांनी म्हटले.

